# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 09/10/2021 (शनिवार)
(सायंकाळ)

---

### जिवानाशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीतांना कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. जलालखेडा :– दिनांक 16/08/2017 चे 23.59 वा. दरम्यान फिर्यादी नामे– नितीन सुनिल बोकडे, वय 27 वर्ष, रा. जलालखेडा यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. जलालखेडा येथे अप. क्र. 135/2017 कलम 307, 506, 34 भादवी सहकलम 4, 25 आर्म ॲक्ट कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक 16/08/2017 चे 16.18 वा. दरम्यान आरोपी क्र. 1. सचिन प्रेमनारायण चौधरी, वय 42 वर्ष व 2. बबलु दशरथ नागमोथे, वय 46 वर्ष दोन्ही रा. जलालखेडा यांनी संगनमत करून फिर्यादी यांना म्हटले की, ''आमच्यावर तुझ्या वडीलाने केस केली ती केस मागे घे'' यावरून फिर्यादीने नकार दिला असता आरोपी क्र. 1 याने फिर्यादीचे मानेवर तलवार ठेवली व आरोपी क्र. 2 याने उजव्या डोळया जवळ भुक्की मारली. आरोपीने फिर्यादीला जिवे मारण्याचे उददेशाने तलवारने वार केले अश्या रिपोर्ट वरून सदर गुन्हा नोंद. आरोपीतांना दिनांक 17/08/2017 चे 03.47 वा. आरोपी क्र. 2. 13.50 वा. दरम्यान अटक करण्यात आली.

सदर प्रकरण्याचे तपास तत्कालीन पोलीस निरीक्षक श्री. तायडे पो.स्टे. जलालखेडा यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. आज दिनांक 09/10/2021 रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्रीमती. व्हि.डी. इंगळे, अतिरीक्त जिल्हा सत्र न्यायाधिश, नागपूर यांनी वरील नमुद दोन्ही आरोपीतांना कलम 324, 34 भादंवि. मध्ये प्रत्येकी 5,000/–रू. दंड व दंड न भरल्यास प्रत्येकी 5 महिने साधी शिक्षा अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी श्री. तपासे यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन सहायक पोलिस निरीक्षक श्री. किशोरकुमार वैरागडे तर कर्मचारी सहा.फौज. श्री. शंकरराव तराळे, पोहवा श्री. अशोक कोरडे यांनी मदत केली आहे.

### अकस्मात मृत्यू

1) पो.स्टे. उमरेडः– अंतर्गत मौजा तांबेखनी शिवार उमेश लांजेवार यांची गिटटी क्रशर चे खदान येथे दिनांक 08/10/2021 चे 07.09 वा. ते दिनांक 08/10/2021 चे 20.35 वा. दरम्यान फिर्यादी नामे– ईमान शहाबुददीन दिवाण, वय 35 वर्ष, रा. वार्ड क्र. 1 दत्तनगर मकाधोकडा हे दि. 8/10/21 चे 00.05 वा जॉगिग ला गेले होते. तेव्हा त्यांचे मोबाईल वर विक्रम शशीकांत घोगरे (मृतक), वय 42 वर्ष रा. खुमारी तह. कळमेश्वर हं. मु. मकरधोकडा यांचा अदाजे 6.00 वा फोन आला होता. परंतु फिर्यादी यांचा फोन सायलन्ट असल्याने जॉगिंग वरून गेल्यावर 07.09 वा. दरम्यान फिर्यादीने त्याला फोन केला असता त्याने सांगितले की, ''तो क्रशरवर आहे व तेथील जनरेटर सुरू करायचे असल्याने मदती करिता ये'' असे म्हटल्याने ठीक आहे असे म्हणुन अंदाजे 10.00 वा. ते 10.30 वा. दरम्यान तांबेखनी येथील क्रेशर मशिनवर फिर्यादी विक्रम घोगरे याच्या मदती करिता गेले असता क्रशर मशीनच्या पाण्यामध्ये विक्रम घोगरे उबडया अवस्थेत दिसल्याने फिर्यादीने मकरधोकडा चौकी जाउन सांगितले व मच्छिमाराचे मदतीने त्याला पाण्यातुन बाहेर काढले असता तो मृत्यु पावलेला दिसला. विक्रम घोगरे

हा दि. 08/10/2021 रोजी सकाळी तांबेखानी येथिल गिटटी क्रशरच्या खदानीमध्ये मशीनच्या सहायाने बकेटनी पाणी काढण्याकरिता गेला असता तेथील चिखलामध्ये स्लीप होवनु खदानी मध्ये पडला व तेथील पाण्यामध्ये बुडुन मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. उमरेड येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोउपनि श्री प्रशांत खोब्रागडे मो. क्र. 8888817183 हे करीत आहे.

2) पो.स्टे. भिवापुर :– अंतर्गत सिध्दार्थ नगर, भिवापुर येथे विश्वनाथ निबांजी बावनगडे(मृतक), वय 50 वर्ष, रा. सिध्दार्थ नगर, भिवापुर यांना दि. 02/10/2021 रोजी सायंकाळी 07.00 वा. भुक लागल्याने घरामध्ये ठेवलेले चिवडा पाकीट व कुरकुरे खाले असता त्यांना उलटी झाली. त्यांना उपचाराकरीता प्रथम ग्रामीण रूग्णालय भिवापुर व नंतर मेडीकल कॉलेज नागपुर येथे नेले असता तेथे उपचार सुरू असता दि. 06/10/2021 चे रात्री 01.30 वा डॉक्टरांनी तपासुन त्यांना मृत घोषित केले. पो.स्टे. भिवापुरला कागदपत्रे प्राप्त झाल्याने सदर मर्ग नोंद.

सदर प्रकरणी सर तर्फे पोहवा राकेश माकडे, मेडीकल पोलिस बुथ नागपूर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. भिवापुर येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोहवा चंद्रकान्त रेवतकर मो. क्र. 9823719197 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर